महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद
GOVT. MEDICAL COLLEGE, AURANGABAD
दूरध्वनी : (०२४०) २४० २०२८ फॅक्स: (०२४०)२४०२४१८

जा.क्र./शावैमऔ/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/जाहिरात/२०२१ ३७७ -३८ . दिनांक- २८.०७.२०२१

## जाहिरात

विषय :- राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रम व व्ही.आर.डी.एल (Viral Research & Diagnostic Laboratory) अंतर्गत लॅबसाठी कंत्राटी पध्दतीने करारतत्वावर पदे भरणेबाबत...

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रम व व्ही.आर.डी.एल (Viral Research & Diagnostic Laboratory) या प्रयोगशाळेकरिता कंत्राटी पध्दतीने करारतत्वावर पदे नेमणुक करावयाची असून यासाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावेत. अर्जाचा नमुना, अटी व शर्ती या संस्थेच्या संकेतस्थळावर www.gmcaurangabad.com उपलब्ध करण्यात आलेला आहे. अर्ज स्वहस्ते खाली नमुद केलेल्या ठिकाणी विहित कालावधीत सादर करावा. ई-मेल, पोस्ट, कुरीयरने पाठविलेले व अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे दोन (२) छायांकित प्रतींमध्ये जोडावीत, तसेच मुलाखतीच्या वेळी मूळ कागदपत्रे सादर करावीत. सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचेनाव | पदसंख्या | शैक्षणिकअर्हता | एकत्रितमानधन |
|---|---|---|---|---|
| १ | रिसर्च असिस्टंट (INFLUENZA) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठातून एम.एससी मायक्रोबायोलॉजी/बायोटेक्नॉलॉजी/लाईफ सायन्स प्रमाणपत्र<br>२) एम.एस.सी आयटी पास<br>३) सुक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळेमध्ये कोविड-१९ अंतर्गत किमान १ वर्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | रु. ३१,०००/-प्रतिमहिना |
| २ | लॅबोरेटरी टेक्निशियन | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठातून बी.एस्सी<br>२) डी.एम.एल.टी प्रमाणपत्र<br>३) एम.एस.सी आयटी पास<br>४) सुक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळेमध्ये कोविड-१९ अंतर्गत किमान १ वर्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | रु. १७,०००/-प्रतिमहिना |
| ३ | डाटा इंट्री ऑपरेटर | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२) एमएससीआयटी<br>३) इंग्रजी ४० श.प्र.मि आणि मराठी ३० श.प्र.मि टायपिंग कोर्स<br>४) सुक्ष्मजीवशास्त्र विभागात कोविड-१९ अंतर्गत किमान १ वर्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | रु. २०,०००/-प्रतिमहिना |

अर्ज स्विकारण्याचा कालावधी : दिनांक ०२/०८/२०२१ ते ०६ /०८/२०२१ वेळः ११.०० ते ०४.३० वाजेपर्यंत
अर्ज स्विकारण्याचे ठिकाणः सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद.
(कार्यालयीन वेळेत)
मुलाखतीचे ठिकाणः सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद.
मुलाखतीचा दिनांक व वेळ : मुलाखतीचा दिनांक व वेळ आपल्या ई-मेलआयडीवर पाठविण्यात येईल.

अटी व शर्ती:

१. सदरची नियुक्ती हि पुर्णपणे कंत्राटी तत्वावर असल्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना शासकीय कर्मचारी यांना मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

२. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.
३. करार पद्धतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४. कंत्राटी नियुक्तीच्या कालावधीत आपले कामकाज समाधानकारक न आढळल्यास किंवा आपले विरुद्ध कोणत्याही प्रकारची पोलीस कार्यवाही झाल्यास किंवा आपलेविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविण्यात आल्यास आपली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

५. आपणांस सदर नोकरीचा राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान एक महिन्याची पुर्वसुचना अथवा एक महिन्याचे वेतन भरावे लागेल.

६. सदर नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असल्याने आपणांस या नियुक्तीच्या अटी व शर्ती किंवा इतर कोणत्याही कारणाकरीता न्यायालयात जाता येणार नाही.

७. करारपद्धतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमीतपणे घेतील. आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचे कडे राहतील.

८. अभियान किंवा ज्या प्रकल्पामध्ये आपली नियुक्ती करण्यात येत आहे तो प्रकल्प काही कारणांस्तव बंद झाल्यास आपली नियुक्तीही आपोआप समाप्त होईल.

९. करार पद्धतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणा खाली आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियीमत पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील.

१०. करार पद्धतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

११. करार पद्धतीवरील नियुक्त उमेदवारांनी कामावर रुजू होण्यापुर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी रु.१०० च्या स्टॅपपेपरवर प्रतिज्ञापत्र/करारपत्र नोटरी करुन कामावर रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे. तसेच पदाच्या नियुक्ती आदेश संदर्भीत घेऊन मा.न्यायालयात कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत याचिका दाखल करणार नसल्याबाबत निवड झालेल्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र (१०० रु. बॉडपेपरवर) लिहून घेण्यात येईल.

१२. नियम व अटींच्या अधिन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१३. मुलाखत अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची आवश्यकतेप्रमाणे लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

१४. निवड झालेल्या उमेदवारांस राहण्याची व्यवस्था स्वतः करावी लागेल.

१५. निवडसमितीचा निर्णय हा अंतिम राहील यासाठी कोणतेही निवेदन / तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

१६. कोणतीही पुर्वसूचना न देता निवडप्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवडसमितीने राखून ठेवले आहेत.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद.

DEAN
Government Medical College,
Aurangabad.